## आजचे पंचांग

गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, चतुर्दशी रात्री ९-१३पर्यंत नंतर पौर्णिमा तिथी,
दिवस नक्षत्र– चित्रा रात्री २-१७ पर्यंत नंतर स्वाती,
चंद्र रास- दुपारी १-१४ पर्यंत कन्या नंतर तुला,
सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## मुंबईची कोंडी

**मुंबई:** दक्षिण मध्य मुंबई आणि दक्षिण मुंबईतील नागरिकांना सध्या प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. शहरात एकाच वेळी बहुतांश रस्त्यांची कामे, खोदकामे, पुलांची बांधकामे आणि काही पुलांवरील वाहतूक बंद असल्याने नियोजनाचे बारा वाजल्याचे चित्र नागरिकांच्या मनस्तापात भर टाकत आहे. मुख्य पुलांची ही अवस्था असल्यामुळे वाहनचालक अंतर्गत रस्त्यांवरून प्रवास करत आहेत. त्यामुळे अगदी लहान रस्त्यांवरही वाहनांच्या रांगा पाहायला मिळत आहेत.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ३० एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २१५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### गुरुग्राममधील शाळांना बॉम्बच्या धमक्या

**गुरुग्राम :** गुरुग्राममधील अनेक शाळांना बुधवारी सकाळी बॉम्ब टाकण्याच्या धमकीचे आणखी एक ई-मेल प्राप्त झाले, ज्यामुळे पोलिसांनी परिसरात शोध सुरू केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खलिस्तान नॅशनल आर्मीने हा ईमेल पाठवला असून त्यात हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांना २९ एप्रिल हा दिवस ४० वा खलिस्तान घोषणा दिवस म्हणून घोषित करण्याची धमकी देण्यात आली आहे.

### मुंबईत एसी लोकलच्या संख्येत वाढ

**मुंबई :** महाराष्ट्र दिनाच्या मुहुर्तावर १ मे पासून मुंबई उपनगरी रेल्वे मार्गावर वातानुकूलित लोकल आणि १५ डब्यांच्या गाड्यांच्या संख्येत वाढ होणार आहे. मध्य रेल्वे सीएसएमटी-पनवेल हार्बर मार्गावरील सध्याच्या १४ नॉन एसी लोकल सेवा एसी लोकलमध्ये रूपांतरित करणार आहे, तर पश्चिम रेल्वे शुक्रवारपासून १२ अतिरिक्त वातानुकूलित लोकल सेवा सुरू करणार आहे आणि विद्यमान १२ डब्यांच्या १७ उपनगरीय गाड्यांना १५ डब्यांच्या सेवांमध्ये बदल करणार आहे. एसी उपनगरीय फेऱ्यांची एकूण संख्या १०८ पर्यंत वाढेल.

### व्यावसायिक वाहनांवर वाढीव कराचा भार

**नवी दिल्ली :** दिल्ली सरकारने राष्ट्रीय राजधानीत प्रवेश करणाऱ्या व्यावसायिक वाहनांवरील पर्यावरण भरपाई शुल्कात (ईसीसी) वाढ जाहीर केली आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा यांनी बुधवारी दिली. एका निवेदनात म्हटले आहे की, हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घेण्यात आला आहे आणि एअर क्वालिटी मॅनेजमेंट आयोगाच्या शिफारशींवर आधारित आहे.

### आसाममध्ये 'कमळ' पुन्हा फुलणार; तामिळनाडूत अभिनेता विजयची मुसंडी

# बंगालमध्ये ममता दीदींना धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांसाठी आज मतदानाची रणधुमाळी संपली आणि त्यासोबतच एक्झिट पोलचे कल समोर आले आहेत. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुडुचेरी या राज्यांमध्ये झालेल्या मतदानानंतर प्रसिद्ध झालेल्या विविध संस्थांच्या अंदाजानुसार, काही ठिकाणी सत्ताधारी आपली खुर्ची टिकवण्यात यशस्वी होताना दिसत आहेत, तर काही ठिकाणी मतदारांनी सत्तांतराचा कौल दिला आहे. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा गड धोक्यात असल्याचे चित्र असून, तिथे भारतीय जनता पक्ष ऐतिहासिक



मुसंडी मारण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पश्चिम बंगालच्या २९४ जागांसाठी झालेल्या लढतीत बहुतांश एक्झिट पोल्सनी भाजपला आघाडी दिली आहे. अंदाजानुसार, भाजपला १४० ते १७५ च्या दरम्यान जागा मिळून ते बहुमताचा १४८ हा आकडा पार करू शकतात. दुसरीकडे, ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला १०० ते १४० जागांच्या आसपास समाधान मानावे लागण्याची चिन्हे आहेत. केवळ 'पिपल्स पल्स'ने तृणमूलला विजयाच्या जवळ नेऊन ठेवले आहे. एकूणच कल पाहता बंगालमध्ये यंदा सत्ताबदल होण्याची दाट शक्यता आहे.

तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक (डीएमके) आघाडी पुन्हा सत्तेवर येईल, असा अंदाज बहुतांश संस्थांनी वर्तवला आहे. मात्र, या निवडणुकीत सर्वात मोठे आकर्षण ठरलेल्या अभिनेता विजय यांच्या 'टीव्हीके' (तमिळगा वेत्री कळघम) पक्षाने पहिल्याच प्रयत्नात मोठी झेप घेतली आहे. 'अॅक्सिस माय इंडिया'च्या धक्कादायक अंदाजानुसार, विजय यांचा पक्ष चक्क ९८ ते १२० जागा जिंकून किंगमेकर किंवा मुख्य विरोधी पक्ष ठरू शकतो.

ईशान्येकडील महत्त्वाचे राज्य असलेल्या आसाममध्ये भाजपने आपले वर्चस्व कायम राखले आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपप्रणीत एनडीए आघाडी पुन्हा एकदा मोठ्या बहुमताने सत्तेत येत असल्याचे सर्वच एक्झिट पोल्सनी एकमुखाने सांगितले आहे. भाजपला ८५ ते १०० च्या दरम्यान जागा मिळतील, तर काँग्रेस आघाडीला केवळ १५ ते ३० जागांवर समाधान मानावे लागेल, असा अंदाज आहे.

केरळमध्ये दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा यंदाही कायम राहताना दिसत आहे. डाव्या लोकशाही आघाडीला (एलडीएफ) मागे टाकत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडी (यूडीएफ) सत्तेवर येईल, असे संकेत एक्झिट पोल्सनी दिले आहेत. यूडीएफला ७५ ते ९० जागा मिळण्याची शक्यता असून, एलडीएफला ५० ते ६५ जागांवर समाधान मानावे लागू शकते.

पुडुचेरी या केंद्रशासित प्रदेशातही भाजप आणि एनआर काँग्रेस यांची आघाडी पुन्हा सत्तेवर येण्याची दाट शक्यता आहे. तिथे पुन्हा एकदा 'कमळ' फुलणार हे स्पष्ट होत आहे.

## बंगालमध्ये ९१% पेक्षा अधिक मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात बुधवारी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ९१ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली असून, राज्यात विक्रमी मतदान झाल्याचे चित्र आहे. प्रचंड उत्साहात मतदान पार पडले असले, तरी काही ठिकाणी तुरळक हिंसाचाराच्या घटनाही घडल्याची माहिती समोर आली आहे.

या टप्प्यात दक्षिण बंगालमधील १४२ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. महिलांसह युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावला. दुपारपर्यंतच मतदानाचा टक्का ६० टक्क्यांहून अधिक झाला होता, यावरून मतदारांचा उत्साह दिसून आला. मात्र, मतदानादरम्यान काही भागात हिंसाचार, दगडफेक आणि बूथजवळ तणावाच्या घटना घडल्या. काही ठिकाणी राजकीय कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. मतदानाच्या सुरुवातीच्या तासांतच काही भागांत तोडफोड आणि गोंधळाच्या घटना नोंदवण्यात आल्या.

याशिवाय, काही ठिकाणी मतदारांना धमकावणे, मतदान प्रक्रियेत अडथळे निर्माण करणे तसेच ईव्हीएम संदर्भात तक्रारी झाल्याचेही समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने संवेदनशील केंद्रांवर सुरक्षा अधिक कडक केली होती. मतदानापूर्वीच सुमारे २,४७३ संशयितांना ताब्यात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती.

## महिला आरक्षणासाठी विशेष अधिवेशन?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील ‘लाडक्या बहिणीं’साठी विविध योजनांचा धडाका लावल्यानंतर आता महायुती सरकार महिला सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर देशपातळीवर निर्णायक भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. महिला आरक्षणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी मे महिन्यात राज्य विधिमंडळाचे एक दिवसीय विशेष अधिवेशन बोलावण्याचे संकेत सूत्रांनी दिले आहेत. अधिवेशनाच्या माध्यमातून महिला आरक्षणाचा मार्ग प्रशस्त करण्यासोबतच विरोधकांची कोंडी करण्याची रणनीती सत्ताधारी पक्षाने आखल्याचे समजते.

महिला आरक्षण विधेयक अर्थात ‘नारी शक्ती वंदन विधेयक’ संसदेत नामंजूर झाल्यानंतर, या मुद्द्यावर विरोधकांचा दुटप्पी चेहरा जनतेसमोर उघडा करण्यासाठी भाजपने देशव्यापी मोहीम हाती घेतली आहे. त्याचाच एक भाग म्हणून हे विशेष अधिवेशन घेण्याचे नियोजन सुरू आहे. सर्वपक्षीय आमदारांना आपली भूमिका मांडण्याची संधी मिळणार असून, आरक्षणाला पाठिंबा देणारा ठराव याद्वारे संमत केला जाण्याची शक्यता आहे. मे महिन्यात हे अधिवेशन पार पडणार असले तरी, तारीख अद्याप स्तरावर ठरलेली नाही. मात्र, लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत यावर शिक्कामोर्तब होऊन तारीख जाहीर केली जाईल. या अधिवेशनामुळे राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे आहेत.

### १० हजार कोटी गुंतवणूक, दीड लाख रोजगारांची संधी

# महाराष्ट्र राज्याचे एआय धोरण जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** कृत्रिम प्रज्ञा (एआय) क्षेत्रात महाराष्ट्र सरकारने मोठे आणि महत्त्वाकांक्षी पाऊल टाकत ‘महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६’ जाहीर केले आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यात ₹१० हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याबरोबरच सुमारे दीड लाख रोजगारनिर्मिती होणार असल्याचा अंदाज आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. याच बैठकीत लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे भारतरत्न डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने अध्यासन (चेअर) स्थापन करण्यालाही मंजुरी देण्यात आली.

मंत्रिमंडळ बैठकीत सामाजिक न्याय, वन, ऊर्जा, महसूल आणि आदिवासी विकास विभागांशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णयही घेण्यात आले. मात्र, त्यात एआय धोरण हा सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला. नवीन धोरणानुसार राज्यभरात एआयच्या संधींचा समतोल साधण्यासाठी सहा ‘एआय उत्कृष्टता केंद्रे’ स्थापन केली जाणार आहेत. यासोबतच पाच ‘एआय इनोव्हेशन सिटीज’ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या माध्यमातून संशोधन, स्टार्टअप्स, उद्योग आणि कौशल्यविकास यांना चालना देण्याचा सरकारचा मानस आहे. एआय पायाभूत सुविधांवर विशेष भर देत महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न या धोरणातून दिसून येतो.

या धोरणामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येण्याची अपेक्षा असून, उद्योग क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. एआय-आधारित उद्योग, डेटा सेंटर्स, स्टार्टअप्स आणि संशोधन क्षेत्रात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. डिजिटल आणि तंत्रज्ञानाधारित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना महाराष्ट्राने एआयच्या माध्यमातून विकासाचा नवा मार्ग स्वीकारल्याचे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

### ठाकरे गटाच्या भूमिकेमुळे मविआत नाराजी

# विधान परिषदेसाठी काँग्रेस उमेदवार देणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत उघडपणे मतभेद समोर आले आहेत. उद्धव ठाकरे यांनी अंबादास दानवे यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर काँग्रेसने आक्षेप नोंदवत स्वतःचा उमेदवार देण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आघाडीतील अंतर्गत तणाव वाढला असून, या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी भाजपकडून अतिरिक्त उमेदवार देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

विधान परिषद निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांनी स्वतः मैदानात उतरावे, अशी भूमिका काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून मांडली जात होती. मात्र ठाकरे यांनी निवडणूक लढवण्यास स्पष्ट नकार दिला. पक्षातील काही नेत्यांकडून त्यांचे मन वळवण्याचे प्रयत्न झाले, तरी ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. यानंतर अंबादास दानवे यांचे नाव जाहीर करण्यात आले. काँग्रेसला विश्वासात न घेता उमेदवारी जाहीर केल्याचा आरोप करत काँग्रेसने नाराजी व्यक्त केली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वतः उमेदवार देण्याचे संकेत दिले आहेत. दिल्लीत पत्रकारांशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसकडेही सक्षम उमेदवार आहेत आणि त्यावर विचार सुरू आहे. बाळासाहेब थोरात, सचिन सावंत यांच्यासह काही अन्य नेत्यांची नावे चर्चेत असल्याची माहिती समोर येत आहे. महाविकास आघाडीत समन्वय न साधता घेतलेल्या निर्णयामुळे ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यात दरी निर्माण झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीत आघाडीची एकजूट ढासळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या मतभेदांचा फायदा घेण्यासाठी भाजपकडून सहावा उमेदवार देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. आघाडीतील मतविभाजन झाल्यास भाजपला अतिरिक्त जागा मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

अंबादास दानवे यांना निवडून आणण्यासाठी सुमारे २९ मतांचा कोटा आवश्यक आहे. शिवसेनेकडे सुमारे २० मते असल्याने उर्वरित मतांसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. काँग्रेसने स्वतंत्र उमेदवार दिल्यास दानवेंच्या विजयाचा मार्ग कठीण होऊ शकतो. महाविकास आघाडीत निर्माण झालेली ही दरी आगामी राजकीय घडामोडींना नवे वळण देणारी ठरू शकते.

## रत्नागिरी जिल्ह्यात पुन्हा भूकंपाचे धक्के

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात पुन्हा एकदा भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असून चिपळूण तालुक्यातील येगाव परिसरात याचा केंद्रबिंदू असल्याची माहिती समोर आली आहे. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता २.७ इतकी नोंदवण्यात आली आहे. महिनाभराच्या अंतरात दुसऱ्यांदा भूकंप झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी १२ मार्च रोजीही जिल्ह्यातील काही भागात अशाच प्रकारचे धक्के जाणवले होते. दरम्यान, जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार या भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झालेले नाही.

# ठाकरेंकडून अंबादास दानवेंना उमेदवारी

### उद्धव ठाकरेंच्या उमेदवारीच्या चर्चेला पूर्णविराम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्याच्या राजकारणात सध्या विधान परिषद निवडणुकीचे वारे वेगाने वाहत आहेत. १० जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत अर्ज भरण्यासाठी अवघा एक दिवस शिल्लक असताना उबाठाने अनपेक्षित निर्णय घेत राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.

उद्धव ठाकरे स्वतः निवडणूक लढवणार, अशी चर्चा सुरू असतानाच आदित्य ठाकरे यांनी अंबादास दानवे यांच्या उमेदवारीची घोषणा केली. या निर्णयातून पक्षाने दोन स्पष्ट संदेश दिल्याची चर्चा आहे, एकीकडे सामान्य शिवसैनिकाला संधी देण्याचा प्रयत्न, तर दुसरीकडे पक्षातील अंतिम निर्णय ठाकरेंचाच असतो, हे अधोरेखित झाले.

भाजपने आधीच आपले सहा उमेदवार जाहीर केल्यानंतर ठाकरेंच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. उद्धव ठाकरे स्वतः रिंगणात उतरतील, अशी शक्यता वर्तवली जात होती आणि काँग्रेसकडूनही त्यांना पाठिंबा मिळण्याचे संकेत होते. मात्र, ठाकरे गटाकडे स्वतःचा उमेदवार निवडून आणण्यासाठी आवश्यक संख्याबळ नसल्याने मित्रपक्षांवर अवलंबून राहावे लागणार आहे. अशा परिस्थितीत अंबादास दानवे यांच्यासारख्या आक्रमक नेत्याला उमेदवारी देत ठाकरेंनी संघर्षाचा पवित्रा कायम ठेवला आहे.

गेल्या काही वर्षांत संजय राऊत हे ठाकरे गटाचे प्रमुख चेहरा आणि धोरण ठरवणारे नेते म्हणून उदयास आले होते. महाविकास आघाडीच्या स्थापनेत त्यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनीच मैदानात उतरावे, यासाठी राऊत आग्रही असल्याचे दिसत होते. मात्र, आदित्य ठाकरेंनी दानवेंचे नाव जाहीर करत वेगळाच निर्णय घेतल्याने पक्षातील समीकरणांवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

### मद्रास हायकोर्टाने मुस्लीम मुलीचे पालकत्व हिंदू दांपत्याला सोपवले

# धर्मापेक्षा बालकाचे हित सर्वोच्च असल्याचा निवाडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मदुराई :** बालकाचे कल्याण हे कोणत्याही धर्मापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे, असे ठाम मत नोंदवत मद्रास हायकोर्टच्या मदुराई खंडपीठाने एका अल्पवयीन मुस्लीम मुलीचे कायदेशीर पालकत्व हिंदू दांपत्याकडे सोपवण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. गार्डियनस् अँड वॉर्डस अॅक्ट १८९० अंतर्गत धर्म हा पालकत्वासाठी अडथळा ठरत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती एन. आनंद व्यंकटेश आणि न्यायमूर्ती के. के. रामकृष्णन यांच्या खंडपीठाने एस. बालाजी यांनी दाखल केलेली



याचिका मंजूर करत हा निकाल दिला.

संबंधित हिंदू दांपत्याला स्वतःचे अपत्य नव्हते. ते गेल्या दहा वर्षांपासून मुलीच्या जन्मदात्या आईला ओळखत होते. ही आई रोजंदारीवर काम करणारी मजूर असून पतीच्या निधनानंतर तीन मुलांचे संगोपन करत होती. आर्थिक अडचणींमुळे तिने आपल्या तिसऱ्या मुलीला जन्मानंतर लगेचच स्वेच्छेने या दांपत्याकडे सोपवले होते.

या दांपत्याने मदुराई येथील कौटुंबिक न्यायालयात कायदेशीर पालकत्वासाठी अर्ज केला होता. मात्र २९ सप्टेंबर २०२५ रोजी हा अर्ज फेटाळण्यात आला. दांपत्य मुलीचे नातेवाईक नसून ‘अनोळखी’ आहेत, तसेच मुलगी अल्पवयीन असल्याचे कारण देत न्यायालयाने पालकत्व देण्यास नकार दिला होता.

उच्च न्यायालयाने हा निर्णय रद्द करत स्पष्ट केले की, पालकत्व निश्चित करताना धर्म हा निकष ठरू शकत नाही. न्यायालयाने नमूद केले की, “पालकत्वाचा निर्णय घेताना बालकाचे कल्याण हा प्रमुख विचार असला पाहिजे. त्याचबरोबर वय, लिंग, धर्म, तसेच संभाव्य पालकांचे चारित्र्य आणि क्षमता यांचाही विचार करणे आवश्यक आहे.”

सुनावणीदरम्यान मुलीच्या जन्मदात्या आईने पुन्हा एकदा आपली संमती दिली. ती आपल्या मुलीला आवश्यक सुविधा देऊ शकत नसल्याने हा निर्णय घेतल्याचे तिने सांगितले. न्यायालयाने मुलीचे दांपत्याशी असलेले नातेही तपासले. मुलगी त्या दांपत्याला ‘आई-बाबा’ म्हणत असल्याचे, तर जन्मदात्या आईला ‘आंटी’ म्हणून संबोधत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. खंडपीठाने कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय रद्द करत संबंधित हिंदू दांपत्याला मुलीचे कायदेशीर पालक म्हणून मान्यता दिली. “न्यायालयाला पक्षांच्या भावनांमध्ये संतुलन राखावे लागते; मात्र अशा प्रकरणांत बालकाचे हितच सर्वोच्च असते,” असे न्यायालयाने स्पष्ट केले.

हा निर्णय बालकल्याणाला प्राधान्य देणारा आणि धर्माच्या चौकटीपलीकडे जाऊन न्याय देणारा महत्त्वपूर्ण न्यायनिर्दर्शक ठरत आहे.

## त्या अमेरिकन नागरिकांना देश सोडण्याचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पर्यटनाच्या नावाखाली शहरात आलेल्या परदेशी नागरिकांकडून व्हिसा नियमांचे उल्लंघन झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. टुरिस्ट व्हिसावर असताना धार्मिक प्रचार आणि पत्रकांचे वाटप केल्याप्रकरणी पुणे पोलिसांनी तीन अमेरिकन नागरिकांविरुद्ध कारवाई करत त्यांना तातडीने भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तिघे नागरिक अनुक्रमे ५३, ६५ आणि ६६ वयोगटातील असून १९ ते २१ एप्रिल २०२६ दरम्यान टुरिस्ट व्हिसावर पुण्यात दाखल झाले होते. टुरिस्ट व्हिसाच्या अटींनुसार परदेशी नागरिकांना केवळ पर्यटनासाठीच परवानगी असते. मात्र हे नागरिक धार्मिक उपक्रमांमध्ये सक्रिय असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

२६ एप्रिलपासून हे तिघे पिंपरी-चिंचवड परिसरातील एका हॉटेलमध्ये राहत होते. २७ एप्रिल रोजी सकाळी पुण्यातील शुक्रवार पेठ परिसरात त्यांनी एका खासगी कॅब चालकाला थांबवून इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषांतील धार्मिक पत्रके वाटण्यास सुरुवात केली. या पत्रकांमध्ये बायबल आणि ख्रिश्चन धर्माविषयी माहिती देण्यात आली होती. कॅब चालकावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न सुरू असताना त्याला संशय आला आणि त्याने तात्काळ पोलिसांना माहिती दिली. त्याच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला. माहिती मिळताच पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्यांच्या जवळ विविध भाषांमधील धार्मिक पत्रकांचा मोठा साठा आढळून आला.

# ओपेकमधील फूट: ऊर्जा महायुद्धाकडे वाटचाल




जागतिक राजकारणात 'स्थैर्य' हा शब्द आता केवळ शब्दकोशातच उरला आहे की काय, असा प्रश्न पडावा अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. रशिया-युक्रेन आणि इस्रायल-हमास यांच्यातील संघर्षाने जागतिक पुरवठा साखळीचा कणा आधीच मोडीत निघालेला असताना, आता मध्यपूर्वेतील 'तेल'काव्याने एका नव्या आणि अधिक गडद संकटाची नांदी दिली आहे. संयुक्त अरब अमिरात (यूएई) सारख्या धोरणात्मकदृष्ट्या प्रगल्भ देशाने 'ओपेक' (ओर्गनायझेशन ऑफ पेट्रोलियम एक्सपोर्टिंग कंट्रीज) या तेल उत्पादक देशांच्या पोलादी संघटनेतून बाहेर पडण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ एका देशाचा तांत्रिक निर्णय नाही; तर तो गेल्या सहा दशकांच्या जागतिक ऊर्जा राजकारणाच्या अंताची सुरुवात आहे.

१९६० च्या दशकात बगदादमध्ये जन्मलेल्या 'ओपेक'ने दशकानुदशके जगाला आपल्या तालावर नाचवले. कच्च्या तेलाचे उत्पादन किती करायचे आणि त्याची किंमत किती ठेवायची, याचा 'रिमोट कंट्रोल' या संघटनेच्या हातात होता. पाश्चिमात्य अर्थव्यवस्थांना वेठीस धरण्याचे सामर्थ्य याच संघटनेने दाखवले होते. मात्र, काळ बदलला तशी या संघटनेच्या अंतर्गत विसंगतीही वाढत गेल्या. सौदी अरेबियाची वाढती एकाधिकारशाही आणि रशियाशी असलेली त्यांची 'ओपेक प्लस'च्या नावाखालील जवळीक ही अमिरातीसारख्या देशाला खटकणारी होती. अमिरातीला आता केवळ 'तेल विकणारा देश' ही मर्यादित ओळख पुसून 'जागतिक आर्थिक आणि व्यापारी केंद्र' बनायचे आहे. त्यासाठी त्यांना स्वतःच्या तेल उत्पादनावर ओपेकच्या लादलेल्या कोट्याचे बंधन नको आहे. पण हा निर्णय घेण्यासाठी त्यांनी निवडलेली वेळ अत्यंत सूचक आणि तितकीच स्फोटक आहे.

इराण आणि पाश्चिमात्य राष्ट्रांमधील संघर्ष आता केवळ मुत्सद्देगिरीच्या टेबलावर राहिलेला नाही. युद्धाची धग प्रत्यक्ष रणांगणावर पोहोचली असताना, 'होर्मुझची सामुद्रधुनी' कोणत्याही क्षणी बंद होऊ शकते, अशी टांगती तलवार जगावर आहे. जगातील एकूण तेल व्यापाराचा एक तृतीयांश हिस्सा याच चिंचोळ्या जलमार्गावरून वाहतो. इराणने हा मार्ग रोखला, तर जागतिक अर्थव्यवस्थेला लागणारी रसद एका रात्रीत कापली जाईल. अशा अत्यंत संवेदनशील काळात ओपेकच्या धोरणांना बांधील राहण्यापेक्षा स्वतंत्र राहून स्वतःचे हितसंबंध जोपासणे अमिरातीला अधिक श्रेयस्कर वाटले असावे. हा 'स्वार्थ' असला तरी तो 'राष्ट्रीय हिता'च्या आवरणात गुंडाळलेला आहे.

अमिरातीचा हा पवित्रा म्हणजे 'ओपेक'च्या गडाला गेलेला पहिला मोठा तडा आहे. यापूर्वी कतार या संघटनेतून बाहेर पडला होता, पण अमिरातीचे जागतिक वजन कतारपेक्षा कितीतरी अधिक आहे. अमिरातीकडे असलेली अफाट उत्पादन क्षमता आणि त्यांचे अमेरिकेशी असलेले घनिष्ट धोरणात्मक संबंध पाहता, हा निर्णय सौदी अरेबियाच्या वर्चस्वाला दिलेले थेट आव्हान आहे. सौदीला तेलाच्या किमती चढ्या ठेवून आपली महत्त्वाकांक्षी 'व्हिजन २०३०' योजना पूर्ण करायची आहे, तर अमिरातीला जास्तीत जास्त तेल उत्पादन करून बाजारपेठ काबीज करायची आहे. या दोन टोकांच्या भूमिकांमध्ये जागतिक बाजारपेठ मात्र भरडली जाणार, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे.

**» तेल उत्पादक देशांची संघटना असलेल्या 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा घेतलेला यूएईचा निर्णय जागतिक भू-राजकारणातील भूकंपासारखा आहे. ऊर्जेच्या जागतिक बाजारपेठेचे समीकरण कायमचे बदलणार आहे.**

या सर्व घडामोडींचा सर्वाधिक फटका भारतासारख्या देशाला बसणे अपरिहार्य आहे. भारत आपल्या गरजेच्या ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. अमिरात हा भारताचा केवळ तेल पुरवठादार नाही, तर तो एक विश्वासार्ह धोरणात्मक भागीदारही आहे. ओपेकची मक्तेदारी मोडल्यास तेलाचे भाव खाली येतील, असा एक वरवरचा तर्क लावला जाऊ शकतो. होर्मुझची सामुद्रधुनी खरोखरच बंद झाली, तर कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १५० डॉलर्सचा टप्पा सहज पार करतील. अशा स्थितीत भारताच्या वित्तीय तुटीचे आणि महागाईचे गणित कोलमडण्यास वेळ लागणार नाही. अमिरातीचा हा पवित्रा 'पेट्रो-डॉलर'च्या साम्राज्याला लागलेली उतरती कळा दर्शवतो. आता देश आपापल्या सोयीनुसार गटबाजी करू लागले आहेत. इतिहासात डोकावले तर लक्षात येते की, जेव्हा जेव्हा ऊर्जेची समीकरणे बदलली आहेत, तेव्हा तेव्हा जागतिक सत्तेची केंद्रंही बदलली आहेत. अमिरातीने घेतलेले हे धाडसी बंड त्यांना भविष्यातील 'मध्यपूर्वेतील सिंगापूर' बनवेल की अराजकाचा बळी ठरवेल, हे येणारा काळच सांगेल. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये 'कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, असते ते फक्त कायमस्वरूपी हित' हे वचन अमिरातीने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. ओपेकचे अस्तित्व आता कदाचित कागदावर उरेल, पण तिची दरारा मात्र संपुष्टात आला आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही.

## संपादकीय

### विनाशाचे नवे सहजीवन



**रशिया आणि इराणमधील वाढती जवळीक जागतिक राजकारणाच्या सारीपाटावर नव्या समीकरणांची नांदी ठरत आहे. पाश्चिमात्यांच्या निर्बंधांनी पिचलेले हे दोन देश आता एकमेकांचे आधारवड बनू पाहत असून, त्याचे दूरगामी परिणाम लोकशाहीवादी जगाला भोगावे लागतील.**

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या परिघात 'मैत्री' हा शब्द अत्यंत लवचिक आणि तितकाच फसवा असतो. तिथे ना कायमस्वरूपी मित्र असतात, ना शत्रू; असते ते केवळ 'हित'. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि इराणचे सर्वोच्च नेते आयतोल्ला खामेनी यांच्यातील वाढती जवळीक या विधानावर शिक्कामोर्तब करणारी आहे. एकेकाळी एकमेकांकडे संशयाने पाहणारे हे दोन देश आज एकमेकांच्या गळ्यात गळे घालून फिरू लागले आहेत, याचे एकमेव कारण म्हणजे त्यांची जागतिक राजकारणातील वाढती एकाकी अवस्था. यातूनच जन्म घेत आहे ते 'विनाशाचे नवे सहजीवन'. रशिया आणि इराण यांच्यातील हा नवा 'निकाह' केवळ मुत्सद्देगिरीचा भाग नाही, तर तो अगतिकतेतून आलेला एक लष्करी करार आहे. रशियासारखी महासत्ता, जिच्याकडे एकेकाळी जगाला धडकी भरवणारे शस्त्रागार होते, तिला आज युक्रेनमध्ये टिकून राहण्यासाठी इराणच्या 'शाहेद' ड्रोनवर अवलंबून राहावे लागत आहे, हे पुतिन यांच्या लष्करी सामर्थ्याचे अध:पतन अधोरेखित करते. दुसरीकडे, इराणला आपल्या हवाई दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी रशियाच्या 'सुखोई-३५' या लढाऊ विमानांची आणि प्रगत हवाई संरक्षण यंत्रणेची नितांत गरज आहे. रशिया (तत्कालीन सोव्हिएत युनियन) आणि पर्शिया (इराण) यांचे संबंध नेहमीच संघर्षाचे राहिले आहेत. मात्र, आज अमेरिकेने लादलेल्या आर्थिक निर्बंधांच्या 'लोखंडी पडद्या'आड हे दोन्ही देश एकत्र आले आहेत. इराणवर दशकानुदशके निर्बंध आहेतच, पण युक्रेन युद्धाने रशियालाही त्याच पंक्तीत नेऊन बसवले आहे. जेव्हा दोन देश जागतिक अर्थव्यवस्थेतून बहिष्कृत होतात, तेव्हा ते आपापसात एक समांतर अर्थव्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न करतात. रशिया आणि इराण आता हेच करत आहेत. इराणसाठी रशियाची ही साथ म्हणजे एका मोठ्या संकटात मिळालेला 'सुरक्षा कवच' आहे. इस्रायल आणि इराणमधील सुप्त युद्ध आता उघड होऊ लागले असताना, रशियासारखी अण्वस्त्रधारी महासत्ता पाठीशी असणे इराणला बळ देणारे ठरते. रशियाने इराणला दिलेले लष्करी तंत्रज्ञान केवळ संरक्षणासाठी नाही, तर ते मध्यपूर्वेतील शक्ती संतुलन बिघडवणारे आहे. युक्रेन युद्धाने रशियाची साधनसामग्री ओसरू लागली असताना इराणकडून मिळणारे ड्रोन आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे रशियाला स्वस्तात उपलब्ध होणारी रसद आहे. या बदल्यात रशिया इराणला अण्वस्त्र तंत्रज्ञानात गुप्त मदत करण्याची शक्यता नाकारता येत नाही. या समीकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ऊर्जा राजकारण. रशिया आणि इराण हे दोन्ही देश नैसर्गिक वायू आणि तेलाचे प्रचंड साठे बाळगून आहेत. हे दोन्ही देश जर एक झाले, तर जागतिक ऊर्जा बाजारपेठेवर त्यांचे नियंत्रण येऊ शकते. युरोपला रशियन वायूपासून तोडल्यानंतर पुतिन आता आशियाई बाजारपेठेकडे वळले आहेत. इराणच्या मदतीने रशिया दक्षिण आशिया आणि आफ्रिकेपर्यंत आपले पाय पसरू पाहत आहे. भारताचे रशियाशी जुने आणि घनिष्ठ संबंध आहेत, तर इराण हा चाबहार बंदरामुळे भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. मात्र, रशिया आणि इराण ज्या प्रकारे पाश्चिमात्य देशांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत आहेत, त्या मुळे भारताला 'तटस्थ' राहणे कठीण जाणार आहे. अमेरिकेशी वाढती जवळीक आणि रशिया-इराणचा हा नवा अक्ष यांच्यामध्ये समतोल राखणे ही भारतीय मुत्सद्देगिरीची खरी कसोटी असेल. पुतिन यांना त्यांचे झारकालीन रशियाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे, तर खामेनी यांना मध्यपूर्वेत आपली इस्लामिक क्रांती पोहचवायची आहे. या दोन महत्त्वाकांक्षा जेव्हा एकत्र येतात, तेव्हा त्यातून जागतिक शांततेला धोका निर्माण होतो. पाश्चिमात्य देशांनी लादलेले निर्बंध या दोन देशांना रोखण्यात अपयशी ठरले आहेत. हे लक्षात घ्यायला हवे की, रशिया आणि इराणचे हे सहजीवन प्रेमावर नाही तर अगतिकतेवर आधारलेले आहे. ज्या दिवशी एकाचे हित पूर्ण होईल किंवा दुसऱ्याची गरज संपेल, त्या दिवशी ही मिठी सैल होईल. परंतु, तोपर्यंत या दोघांनी जागतिक राजकारणात जो गोंधळ घातलेला असेल, तो निस्तरताना जगाच्या नाकी नऊ येतील. पुतिन यांचे 'युद्ध' आणि खामेनी यांची 'धर्मांधता' यांचा हा संगम जगाला एका नव्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभा करत आहे. रशियाने इराणला दिलेली ही मिठी इराणला सामर्थ्यवान बनवत असली, तरी ती जागतिक शांततेचा गळा घोटणारी ठरणार आहे. सत्तेच्या खेळात जेव्हा दोन जखमी वाघ एकत्र येतात, तेव्हा त्यांची शिकार केवळ समोरचा नसतो, तर संपूर्ण जंगल असते. रशिया-इराणच्या या नव्या दोस्तीमुळे जागतिक शांततेच्या जंगलात आता वणवा पेटण्याची चिन्हे दिसत आहेत.

# नगरसेवकांवर कारवाईची मागणी

## ६० कोटींचा अर्थसंकल्प घोटाळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** बोगस उपसूचनांच्या आधारे अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये वाढ-घट करून तब्बल ६० कोटी रुपयांची बिले ठेकेदारांना परस्पर अदा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणातील उपसूचनांवर नगरसेवकांनी सूचक व अनुमोदक म्हणून सह्या केल्याने पदाचा गैरवापर झाल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे संबंधित नगरसेवकांनाही दोषी ठरवून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी आणि त्यांचे पद रद्द करावे, अशी मागणी विविध संघटना व राजकीय पक्षांकडून करण्यात येत आहे.

बोगस १४ उपसूचनांच्या आधारे अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये फेरबदल करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार करण्यात आल्याचे प्राथमिक चौकशी अहवालात स्पष्ट झाले आहे. चौकशी समितीने हा अहवाल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे सादर केला असून, त्यात मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांच्यासह संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना दोषी ठरवण्यात आले आहे.

सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीची मान्यता न घेता काही बिले लेखा विभागाकडून थेट ठेकेदारांना अदा करण्यात आल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ९ अंतर्गत कलम ८४(२), ८६, ८७ आणि १०३ नुसार अर्थसंकल्पातील निधीचा वापर, कपात किंवा बदली करण्यासाठी स्थायी समिती व महापालिका सभेची मंजुरी आवश्यक असते. मात्र, १४ उपसूचनांच्या बाबतीत ही प्रक्रिया पाळण्यात आली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ६० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे अधोरेखित झाले आहे. उपसूचनांवर नगरसेवकांच्या सह्या असल्याने त्यांच्या सहभागावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यामुळे संबंधित नगरसेवकांवरही गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

बोगस उपसूचनांच्या आधारे आर्थिक व्यवहार केल्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, संबंधित अधिकारी, नगरसेवक आणि ठेकेदारांविरुद्ध गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे.

या प्रकरणात १४ उपसूचनांवर सह्या करणाऱ्या नगरसेवकांचा सहभाग उघड झाल्याने त्यांनी पदाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. त्यामुळे अशा नगरसेवकांचे पद रद्द करावे आणि संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी आम आदमी पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी केली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये अँटी ड्रग मोहीम कडक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने सर्वसमावेशक आणि कडक 'स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर' (एसओपी) लागू केली आहे. महाराष्ट्र राज्य अमली पदार्थ टास्क फोर्सच्या सूचनांनुसार प्रत्येक शाळा, महाविद्यालय आणि वसतिगृह स्तरावर अँटी ड्रग कमिटी स्थापन करण्याचे तसेच सरप्राईज तपासणी पथके कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता आणि भविष्य जपणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्यांमधील वाढत्या व्यसनाधीनतेच्या पार्श्वभूमीवर पोलिस ठाणे स्तरावर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. पथनाट्य, व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध, वक्तृत्व, पोस्टर आणि चित्रकला स्पर्धांच्या माध्यमातून अमली पदार्थांचे दुष्परिणाम प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जाणार आहेत. यासाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील सादरीकरणांचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक उपक्रमाचे छायाचित्रण व व्हिडिओ रेकॉर्डिंग करून सविस्तर अहवाल सादर करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. वाहतूक शाखेच्या 'एक दिवस शाळेसाठी' या उपक्रमालाही या मोहिमेशी जोडण्यात आले आहे.

# पीएमपी बसथांब्यांवर शेडचा अभाव; उन्हात प्रवाशांची परवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुणे आणि पिंपरी-चिंचवडकरांची जीवनवाहिनी मानली जाणारी पीएमपी बससेवा सध्या प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे. शहरातील अनेक ठिकाणी बसथांब्यांवर शेड नसल्याने नागरिकांना रखरखत्या उन्हात उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. वाढत्या तापमानामुळे ही समस्या अधिक तीव्र बनली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे.

नोकरी व कामानिमित्त दररोज लाखो प्रवासी पीएमपी बससेवेचा वापर करतात. मात्र, प्रवासी संख्या मोठी असतानाही अनेक भागांत बसशेडची सोय नसल्याचे दिसून येते. पीसीएमसी चौक, आकुर्डी, भोसरी, तळवडे, निगडी, थेरगाव, डांगे चौक, लांडेवाडी आदी भागांत प्रवाशांना उन्हात उभे राहून बसची वाट पाहावी लागत आहे. काही ठिकाणी उभारलेली शेडही जीर्ण अवस्थेत असल्याने प्रवासी झाडे किंवा इमारतींच्या आडोशाला थांबताना दिसतात. शहरातील मेट्रो कामे, रस्ते दुरुस्ती आणि बंद पडलेली बीआरटी व्यवस्था यामुळे अधिकृत बसथांब्यांऐवजी अन्य ठिकाणी बसेस थांबवल्या जात आहेत. त्यामुळे प्रवाशांना बस पकडण्यासाठी धावाधाव करावी लागत आहे. याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना बसत आहे.

# वल्लभनगर आगारात आरक्षणासाठी गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** उन्हाळ्याच्या सुट्ट्यांची चाहूल लागताच गावी जाणाऱ्या प्रवाशांची लगबग वाढली असून पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर आगारात आरक्षण काउंटरवर मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मराठवाडा, विदर्भ आणि कोकण मार्गावरील बससेवांसाठी तिकीट बुकिंगसाठी प्रवाशांची अक्षरशः झुंबड उडाली आहे. मात्र, या प्रक्रियेत नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने सुट्टीतील प्रवास त्रासदायक ठरत आहे.

शाळा आणि महाविद्यालयांना सुट्ट्या लागल्याने विद्यार्थी, नोकरदार आणि कुटुंबांसह प्रवासी मोठ्या संख्येने आपल्या मूळ गावी रवाना होण्यासाठी आगारात दाखल होत आहेत. गेल्या पंधरा दिवसांत दररोज सुमारे ३०० ते ४०० तिकिटांचे बुकिंग होत असून आतापर्यंत अंदाजे २ लाख रुपयांहून अधिकची उलाढाल झाल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत असतानाही प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा अपुऱ्या असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर आगारात पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था आणि बसण्याची सोय नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह आलेल्या प्रवाशांचे हाल होत आहेत. विशेषतः महिलांसाठी आणि ज्येष्ठांसाठी बाकडे किंवा आसनव्यवस्था नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गर्दी वाढूनही अतिरिक्त आरक्षण काउंटर सुरू करण्यात आलेले नसल्याने रांगा अधिक लांबत आहेत.

तिकीटासाठी प्रवाशांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असून तिकीट मिळेल की नाही याचीही खात्री नसल्याने अस्वस्थता वाढत आहे. आरक्षण केंद्र असूनही दीर्घ प्रतीक्षेमुळे नागरिकांनी प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी दीर्घकाळ उभे राहणे अशक्य ठरत असल्याने त्यांचा संताप वाढत आहे. "किमान बसण्याची सोय तरी करायला हवी होती," अशी संतप्त प्रतिक्रिया एका प्रवाशाने दिली. वाढत्या प्रवासी संख्येच्या तुलनेत उपलब्ध सुविधा अत्यंत अपुऱ्या असल्याचे स्पष्ट होते. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीने अतिरिक्त तिकीट खिडक्या सुरू करणे, पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय करणे आणि महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी आसनव्यवस्था उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याची मागणी होत आहे.

# बंगल्यात गांजाची लागवड उघड; सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** शहरातील लोहगाव परिसरात एका बंगल्याच्या आवारात गांजाची लागवड करून विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार पोलिस कारवाईत उघडकीस आला आहे. लोहगाव पोलिसांनी छापा टाकत गांजाची झाडे, वाहन आणि मोबाईल असा सुमारे ६ लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पठारे वस्ती परिसरात गांजाची लागवड सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनीषा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (ता. २७) विशेष पथकाने छापा टाकला.

या कारवाईत हर्ष भरतकुमार पांचाल (वय ३०, रा. नमो पॅराडाईज, पठारे वस्ती, लोहगाव) याने भाडेतत्त्वावर घेतलेल्या बंगल्याच्या आवारात गांजाची लागवड केल्याचे समोर आले. बंगल्याच्या गार्डनमध्ये लहान-मोठी मिळून तब्बल ४१ गांजाची झाडे आढळून आली. या झाडांचे एकूण वजन सुमारे साडेचार किलो असल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपीच्या ताब्यातील वाहनातूनही गांजा जप्त करण्यात आला असून घटनास्थळावरून ९ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत. या प्रकरणी हर्ष पांचाल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपायुक्त सोमय मुंडे, तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनीषा पाटील यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक शुभांगी मगदुम, पोलिस उपनिरीक्षक मनोज बरुरे यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

### मोशीत घरभाडे वादातून मारहाण

**पुणे :** मोशी परिसरातील बो-हाडेवाडी येथे घरभाड्याच्या वादातून महिलेसह तिच्या कुटुंबीयांना मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २६ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी जयश्री बाळू जाधव (वय ४५, रा. सिल्व्हर ब्ल्यू हॉटेल मागे, बो-हाडेवाडी, मोशी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादींच्या तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांच्या घरात घुसून घरभाड्याच्या कारणावरून शिवीगाळ केली. त्यानंतर लाकडी फळी आणि काठीच्या साहाय्याने फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना मारहाण करण्यात आली. या घटनेत फिर्यादी आणि त्यांच्या नातेवाईकांना दुखापत झाली आहे. या प्रकरणी सारिका बो-हाडे (वय ४०), आदित्य बो-हाडे (वय २०) आणि निशा बो-हाडे (वय १८, सर्व रा. बो-हाडेवाडी, मोशी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटना घडल्यानंतर आरोपी फरार झाले असून पोलिसांकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. पुढील तपास सुरू आहे.

### कोयत्याने वार करून निर्घृण हत्या; दोघांना अटक

**पुणे :** जाधववाडी परिसरात एका तरुणाची कोयत्याने वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून इतर संशयितांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. २६ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून २७ एप्रिल रोजी अधिकृत नोंद करण्यात आली. मृत तरुणाचे नाव रविंद्र उर्फ रवी जाधव (वय ४४) असे आहे. या प्रकरणातील आरोपींमध्ये विशाल सुखदेव जाधव (वय २१) आणि ओंकार किरण साळसे (वय २२) यांचा समावेश असून, त्यांच्यासह दोन अज्ञात इसमांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, पैशांच्या आणि जमिनीच्या वादातून हा खून झाल्याचे समोर आले आहे.

# भरधाव कारच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे परिसरात भरधाव कारच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हा अपघात २७ एप्रिल २०२६ रोजी पहाटे सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास जुना पुणे–मुंबई महामार्गावर घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमेश्वर रंगनाथ काळे (वय ३४, रा. जांभूळ, ता. मावळ) हा आपल्या कार (एमएच ०४ जिजे १२७२)ने भरधाव वेगात जात असताना त्याने रस्ता ओलांडणाऱ्या रामबाबू चन्नेश्वर राम (वय ३६) यांना जोरदार धडक दिली. या अपघातात रामबाबू यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०६(१), २८१, ३२४(४) तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस शिपाई मच्छिंद्र किसन कांदळकर (वय ३०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सोमेश्वर काळे याला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पोलीस ठाण्याच्या आवारातच हल्ला

**दौंड :** दौंड पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलेल्या तरुणावर पोलीस ठाण्याच्या पार्किंगमध्येच कोयता आणि लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सोमवारी (दि. २७) रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून, यामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मयूर पोपट सुळ (वय ३०, रा. गोपाळवाडी, ता. दौंड) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दौंड पोलिसांनी प्रतिक महादेव होले, संकेत राजू होले, राजू दिनकर होले, ऋषीकेश रमेश होले, साजन गिरमे, शेखर झोरे, श्रीनाथ सोपान होले, गोरख बनकर, संदीप छगन होले तसेच इतर ३ ते ४ अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, संबंधित आरोपींनी पोलीस ठाण्याच्या आवारातील पार्किंगमध्ये मयूर सुळ यांना गाठून कोयता व लोखंडी रॉडच्या साहाय्याने गंभीर मारहाण केली. या हल्ल्यात ते जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### देहूरोडमध्ये भरदिवसा कार्यकर्त्यावर गोळीबार

**देहूरोड :** देहूरोड परिसरात भरदिवसा झालेल्या गोळीबाराच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. भाजपशी संबंधित असलेल्या कार्यकर्त्यावर अज्ञातांनी गोळ्या झाडल्याची धक्कादायक घटना घडली असून, यात रमेश रेड्डी यांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात हल्लेखोरांनी रमेश रेड्डी यांना लक्ष्य करत सलग गोळीबार केला. त्यातील एक गोळी त्यांच्या डोक्यात लागल्याने ते गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने देहूरोड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. नातेवाईक व समर्थकांनी आक्रोश व्यक्त करत जुन्या पुणे–मुंबई महामार्गावर रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

---

### माजी सीआरपीएफ जवान चौरे यांचा दुर्दैवी मृत्यू

# आळंदीतील वाहतूक कोंडीने घेतला बळी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** आळंदी तीर्थक्षेत्र देवदर्शनासोबतच आता लग्नाचे शहर म्हणूनही ओळखले जाऊ लागले आहे. मात्र, शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीमुळे एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. भीमाजी तुकाराम चौरे (वय ५९), जे केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) मध्ये २२ वर्षे सेवा करून निवृत्त झाले होते, यांचे तीव्र हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले. वेळेत उपचार न मिळाल्याने त्यांचा जीव गेला, असा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

चौरे कुटुंबीय आळंदीतील पद्मावती रोड, जगन्नाथ पार्क येथे वास्तव्यास आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, भीमाजी चौरे यांना घरीच अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्याची गरज होती. घराजवळच के.के. हॉस्पिटल अवघ्या १ किलोमीटर अंतरावर असतानाही पद्मावती रोडवरील प्रचंड वाहतूक कोंडीमुळे त्यांना वेळेत पोहोचवणे शक्य झाले नाही. त्या दिवशी परिसरातील अनेक मंगल कार्यालयांमुळे रस्त्यावर प्रचंड गर्दी झाली होती. चारचाकी वाहनातून रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न निष्फळ ठरल्याने कुटुंबीयांनी वाहन रस्त्याच्या कडेला सोडून देत भीमाजी चौरे यांना ऑटो-रिक्षामध्ये हलवले. परिस्थिती इतकी गंभीर होती की, रिक्षाला मार्ग मिळावा म्हणून त्यांच्या पत्नी आणि मुलीला रस्त्यावर धावत जाऊन वाहनचालकांना बाजूला होण्याची विनंती करावी लागली.

अवघ्या १ किलोमीटरचा प्रवास पूर्ण करण्यासाठी तब्बल २० मिनिटे लागली. या विलंबामुळे भीमाजी चौरे यांना वेळेत वैद्यकीय मदत मिळू शकली नाही आणि उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे आळंदीतील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पद्मावती रोडवरील वाढत्या मंगल कार्यालयांमुळे होणारी वाहतूक कोंडी ही स्थानिकांसाठी रोजची समस्या बनली आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा वैयक्तिक वाहनांना मार्ग मिळणे कठीण होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. स्थानिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. विशेषतः पद्मावती रोडवरील वाहतूक नियंत्रण, पार्किंगची योग्य व्यवस्था आणि मंगल कार्यालयांच्या व्यवस्थापनावर निर्बंध घालण्याची गरज सामाजिक कार्यकर्ते शशिकांतभाऊ घुंडरे पाटील यांनी व्यक्त केली. यापूर्वीही या भागात वाहतूक कोंडीमुळे अपघात होऊन बळी गेले असल्याचे निदर्शनास आले आहे.

देशसेवा केलेल्या एका निवृत्त जवानाचा जीव वाहतूक कोंडीमुळे जाणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असून, भविष्यात अशी घटना घडू नये यासाठी प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आळंदी येथील स्मशानभूमीत रविवारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

# आंबेगाव पश्चिमेला रानमेवा बहरला...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पश्चिमेकडील आदिवासी पट्ट्यातील आहुपे–पिंपरगणे परिसर सध्या नैसर्गिक संपत्तीने बहरून गेला असून रानमेव्याची मोठी रेलचेल पाहायला मिळत आहे. डोंगररांगांमध्ये वसलेल्या या भागात उन्हाळ्याच्या दिवसांत विविध रानफळांचा हंगाम सुरू झाला असून स्थानिक आदिवासी बांधवांसाठी हा काळ आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरत आहे.

यंदा विशेषतः ‘डोंगरची काळी मैना’ म्हणून ओळखली जाणारी करवंदे मोठ्या प्रमाणात पिकली आहेत. गोड, आंबट आणि तुरट अशा तिन्ही चवींचा संगम असलेली ही करवंदे चवीला जितकी खास, तितकीच आरोग्यासाठीही फायदेशीर मानली जातात. डोंगराच्या कडेकपारीत, दाट जंगलात उगवणाऱ्या या झाडांवरील करवंदांची तोडणी करणे अत्यंत कष्टाचे आणि धोकादायक काम असते. तरीही स्थानिक आदिवासी युवक-युवती मोठ्या धाडसाने ही फळे गोळा करत आहेत. यासोबतच या परिसरात ‘तोरणा’ ही गोड व पिठूर फळेही यंदा मोठ्या प्रमाणात बहरली आहेत. अनेक वर्षांतून एकदाच झाडांना येणारी ही फळे दुर्मीळ मानली जातात. त्यांच्या चवीमुळे आणि पौष्टिक गुणधर्मांमुळे बाजारात त्यांना चांगली मागणी असते. परिणामी, या फळांच्या विक्रीमुळे आदिवासी कुटुंबांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

या फळांची काढणी करताना डोंगर-दऱ्यांमध्ये चढ-उतार करावे लागतात, काटेरी झुडपे आणि वन्यजीवांचा धोका पत्करावा लागतो. तरीही पारंपरिक पद्धतीने हे काम करत स्थानिक बांधव आपला उदरनिर्वाह चालवत आहेत. बाजारपेठेत या रानफळांना चांगला दर मिळत असल्याने त्यांच्यासाठी हा हंगाम आर्थिकदृष्ट्या दिलासा देणारा ठरत आहे.

---

# भकल्याणराव आखाडे यांना उमेदवारी द्या



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांना विधान परिषदेची उमेदवारी द्यावी, अशी मागणी सावता परिषदेच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्याकडे करण्यात आली आहे. ही माहिती सावता परिषदेचे कार्याध्यक्ष संतोष राजगुरू यांनी दिली.

या संदर्भात सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी रायगड जिल्ह्यातील रोहा येथील संपर्क कार्यालयात शनिवारी (दि. २५) सुनील तटकरे यांची भेट घेत निवेदन सादर केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष गणेश दळवी, प्रदेश कार्याध्यक्ष संतोष राजगुरू, पुणे जिल्हाध्यक्ष गोरक्ष भुजबळ, उपाध्यक्ष राजाभाऊ आल्हाट, युवक जिल्हाध्यक्ष रवींद्र गायकवाड, इंदापूर तालुका अध्यक्ष प्रकाश नेवसे, तसेच अशोक भुजबळ, सुदाम भुजबळ, तुषार राख, भरत आल्हाट, राजू केदारी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सावता परिषदेचे पदाधिकारी राज्यातील विविध जिल्ह्यांत सक्रिय असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनवाढीसाठी कार्यरत आहेत. कल्याणराव आखाडे यांनी सावता परिषद आणि राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली असून, राज्यभर दौरे करत संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या मागणीसंदर्भात राज्याच्या उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, युवा खासदार पार्थ पवार तसेच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनाही निवेदन देण्यात येणार असल्याचे संतोष राजगुरू यांनी सांगितले.

---

# खते, बी-बियाण्यांचा पुरेसा साठा ठेवा

### आमदार बाबाजी काळे यांचे संबंधित यंत्रणांना निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर :** खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याने तालुक्यात खते, बी-बियाण्यांची गरज लक्षात घेऊन पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा आणि शेतकऱ्यांसाठी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना आमदार बाबाजी काळे यांनी केल्या.

खेड बाजार समितीच्या सभागृहात कृषी विभागाच्या वतीने मंगळवारी आयोजित खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य तथा बाजार समिती सभापती विजयसिंह शिंदे पाटील, पंचायत समिती सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, गटनेते माऊली ढेरंगे, सदस्य दिलीप डुबे, रूपाली कांबळे, कविता राक्षे, शंकर कावडे, मनिषा हिले, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. दत्तात्रय गावडे, तालुका कृषी अधिकारी वैभव विश्वे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, पंचायत समिती कृषी अधिकारी सोनाली पवार तसेच कृषी, महसूल व ग्रामविकास विभागाचे कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते.

मागील वर्षातील कृषी विभागाच्या कामकाजाचा आढावा तालुका कृषी अधिकारी वैभव विश्वे यांनी सादर केला. यात विविध योजनांची अंमलबजावणी, पीक प्रात्यक्षिके, तसेच चालू हंगामातील खते व बियाण्यांच्या उपलब्धतेबाबतचा तपशील मांडण्यात आला.

विजयसिंह शिंदे पाटील यांनी कृषी विभागाने विविध शेतीविषयक मेळावे आयोजित करून आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे, असे सुचविले. पंचायत समिती सभापती विद्या मोहिते यांनी शेतकऱ्यांनी पंचायत समितीच्या योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी आमदार बाबाजी काळे यांनी खते व बियाण्यांचा मुबलक साठा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. कृषी विभागाच्या वतीने गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण करण्यात आले.

---

# रांजणगाव गणपती येथे ‘महामॅरेथॉन’

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** येथे दि. १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधत ‘रन फॉर फिटनेस’ या संकल्पनेवर आधारित ९ वी भव्य महामॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा उद्योजिका शोभाताई धारिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आर. एम. धारिवाल फाऊंडेशन आणि महागणपती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रांजणगाव एमआयडीसी येथील राजमुद्रा चौकात पार पडणार आहे.

या वर्षीच्या महामॅरेथॉनचे विशेष आकर्षण म्हणजे लोकप्रिय अभिनेते सिद्धार्थ जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेला अधिकच आकर्षण प्राप्त होणार आहे. तसेच मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून जान्हवी धारिवाल बालन (एमडी, माणिकचंद ऑक्सीरिच व अध्यक्ष, आर. एम. धारिवाल फाऊंडेशन) आणि पुनीत बालन (एमडी, पुनीत बालन ग्रुप व अध्यक्ष, इंद्राणी बालन फाऊंडेशन) हेही उपस्थित राहणार आहेत.

महामॅरेथॉनचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये फिटनेसविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे. विद्यार्थी, युवा खेळाडू, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांनी नियमित व्यायाम आणि धावण्यासारख्या उपक्रमांद्वारे निरोगी जीवनशैली स्वीकारावी, यासाठी ही स्पर्धा आयोजित केली जाते. २०१८ पासून सातत्याने आयोजित केली जाणारी ही स्पर्धा आरोग्यदायी जीवनशैली, शारीरिक तंदुरुस्ती आणि सामाजिक एकात्मता वाढवण्यासाठी प्रभावी ठरत आहे. दरवर्षी या स्पर्धेत सुमारे ५००० स्पर्धक उत्स्फूर्तपणे सहभागी होत असून, शालेय विद्यार्थी, युवक-युवती, खेळाडू, कामगार आणि स्थानिक नागरिकांचा प्रमाणावर सहभाग असतो. १४ वर्षांवरील कोणालाही यात सहभागी होता येणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिके, चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच सर्व स्पर्धकांसाठी टी-शर्ट, चेस्ट नंबर आणि नाश्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ‘फिटनेस’ या संदेशाला बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

# ग्रामीण भागात चुलींना ‘सुगीचे दिवस’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या गॅस टंचाईचा फटका आता हॉटेल व्यवसायालाही बसू लागला आहे. गॅसचा तुटवडा आणि वाढलेल्या दरांमुळे अनेक हॉटेल व्यावसायिकांनी चुलीकडे वळण्याचा पर्याय स्वीकारला असून, ग्रामीण भागात पुन्हा पारंपरिक स्वयंपाक पद्धतीला मागणी वाढली आहे.

गॅस टंचाईचा फायदा घेत काही विक्रेत्यांकडून अवाच्या सवा दराने सिलिंडर विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांची आर्थिक पिळवणूक होत असून, पर्याय म्हणून चुलीवर स्वयंपाक सुरू करण्यात आला आहे. गॅस एजन्सीकडे व्यावसायिक सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने पुरवठा विस्कळीत झाला आहे. परिणामी, अनेक ठिकाणी गॅस संपल्यानंतर नवीन सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने हॉटेल बंद ठेवण्याची वेळ येत आहे. मात्र, अनेक व्यावसायिकांनी चूल पेटवूनच काम सुरू ठेवले आहे. सध्या वडापाव, मिसळ, चहा, भजी तसेच जेवणाचे विविध पदार्थ चुलीवरच तयार केले जात असल्याचे दिसून येत आहे. “गॅस नसल्यामुळे हॉटेल बंद ठेवणे शक्य नाही. ग्राहक उपाशी जाऊ नयेत म्हणून चूल पेटवली. चुलीवरील जेवणाला वेगळी चव येते आणि ती ग्राहकांना आवडत आहे. मात्र धुराचा त्रास होतो, वेळ अधिक लागतो आणि लाकूडफाटा महाग असल्याने खर्च वाढतो,” असे हॉटेल व्यावसायिकांनी सांगितले.

चुलीवर तयार होणाऱ्या पदार्थांना ‘स्मोकी फ्लेवर’ मिळत असल्याने अनेक ग्राहक खास चवीसाठी हॉटेलमध्ये येत असल्याचेही चित्र आहे. जुन्नर तालुक्यात घरगुती आणि व्यावसायिक गॅसचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवत असून नागरिक आणि व्यावसायिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

---

# आळंदीतील बाह्यवळण मार्ग झाले स्वच्छ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदी येथील बाह्यवळण मार्गावरील कचऱ्याचे साम्राज्य अखेर हटवण्यात आले असून, या स्वच्छता मोहिमेमुळे परिसर स्वच्छ झाला आहे. अस्वच्छतेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर प्रशासनाने तत्काळ दखल घेत कारवाई सुरू केली.

व्हिडिओ समोर आल्यानंतर आळंदी नगरपरिषद प्रशासनाने त्वरित हालचाल करत बाह्यवळण मार्गाच्या दुतर्फा स्वच्छता मोहीम हाती घेतली. जेसीबीच्या सहाय्याने साचलेला कचरा उचलण्यात आला. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी आरोग्य विभागाला तातडीच्या सूचना देत स्वच्छतेचे काम वेगाने पूर्ण करण्याचे आदेश दिले. संकलित कचरा ट्रॅक्टर व ट्रकद्वारे पुढील विल्हेवाटीसाठी पाठवण्यात आला.

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी नागरिक आणि भाविकांना कचरा घंटागाडीतच टाकण्याचे तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा न फेकण्याचे आवाहन केले आहे. आळंदी लगतच्या केळगाव व चऱ्होली खुर्द येथील काही नागरिकांकडून ये-जा करताना बाह्यवळण मार्गावर कचरा टाकला जात असल्याची समस्या कायम होती. याबाबत नगरपरिषदेकडून संबंधित प्रशासनाला वारंवार कळवूनही प्रश्न सुटत नव्हता.

मागील महिनाभर साचलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली होती. त्यामुळे भाविक व नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. अखेर प्रशासनाने तत्काळ दखल घेत स्वच्छता मोहीम राबवत परिस्थितीत सुधारणा केली.

चऱ्होली खुर्द, केळगाव आणि आळंदी परिसरात कचरा व्यवस्थापनाबाबत प्रभावी जनजागृती मोहिमेची गरज असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. आळंदी जनहित फाउंडेशनसह अनेक नागरिकांनी प्रशासनाने त्वरित कारवाई करून परिसर स्वच्छ केल्याबद्दल समाधान व्यक्त करत कौतुक केले.

---

### विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला वाव मिळण्यासाठी उपक्रम

# इंग्लिश टॅलेंट सर्च स्पर्धा उत्साहात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी येथे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषयाची ‘इंग्लिश टॅलेंट सर्च’ स्पर्धा शिवाजीराव आढळराव पाटील विद्यालयात उत्साहात संपन्न झाली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून जिल्हा परिषद शाळांतील इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी सीबीएसई पॅटर्न सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला वाव मिळावा या उद्देशाने पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या प्रेरणेने, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आंबेगाव विकास गटातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळांचा पट वाढावा, विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवावे आणि इंग्रजी विषयाची भीती कमी व्हावी यासाठी शाळा पातळी, केंद्र, बीट व तालुका पातळीवर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत इंग्रजी स्पेलिंग पाठांतर, स्टोरी टेलिंग, कविता गायन, इंग्रजी संवाद तसेच एक ते शंभर अंकांचे स्पेलिंग अशा विविध स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांचे कौशल्य तपासण्यात आले.

या स्पर्धेत ओवी रुपेश वायाळ (शाळा : आंबेगाव वसाहत) हिने प्रथम क्रमांक, श्रीशा किरण लोहोट (शाळा : साकोरे) हिने द्वितीय क्रमांक, मल्हार राहुल थोरात (शाळा : चांडोली बुद्रुक) याने तृतीय क्रमांक, शिवांश गणपत रिठे (शाळा : वळती) याने चौथा क्रमांक, तर सर्वज्ञ तांबडे (शाळा : तांबडेमळा) याने पाचवा क्रमांक पटकावला. तालुकास्तरीय स्पर्धेचे परीक्षण पंचायत समितीचे विषयतज्ज्ञ ज्योत्स्ना माशेरे आणि संजय हुले यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन पंचायत समिती आंबेगावचे सभापती कैलास बुवा काळे, उपसभापती ज्योती पारधी, गटविकास अधिकारी प्रमिला वाळूज आणि गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांनी केले. इंग्रजी ही केवळ एक भाषा नसून ती जागतिक संवादाचे प्रभावी माध्यम आहे. विविध विषयांचे व्यापक ज्ञान इंग्रजीमुळे सर्वांसाठी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे इंग्रजी ही ज्ञानभाषा ठरली आहे. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच इंग्रजीवर प्रभुत्व मिळवावे, यासाठी आंबेगाव तालुक्यात इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी ‘इंग्लिश टॅलेंट सर्च’ उपक्रम राबविण्यात येत आहे, असे गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांनी सांगितले.

---

# अन्न-पाण्यासाठी पशुपक्ष्यांची भटकंती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील डोंगराळ परिसरात अन्न व पाण्याच्या शोधात वन्यप्राणी आणि पक्ष्यांची भटकंती वाढली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पहाडदरा येथील घाटरस्ता, धामणी–शिरदाळे घाट परिसर, धामणी खिंड, लोणी–खेड रस्ता, बागवस्ती घाट परिसर, खंडागळे वस्ती, खडकवाडी, पोंदेवाडी तसेच वडगावपीर, मांदळेवाडीतील ऊंबरखोर, झंजळ डोंगर परिसर आणि धरणवस्ती जवळील भैरवनाथ मंदिर (पिंपळवाडी), लाखणगाव वनीकरण परिसरात मोठ्या प्रमाणावर वन्यप्राण्यांचे वास्तव्य आहे. या भागातील नैसर्गिक पाणवठे आटल्यामुळे हे प्राणी अन्न-पाण्यासाठी मानवी वस्तीकडे येऊ लागले आहेत. ओढे व नाले पूर्णपणे कोरडे पडल्याने पाण्याचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. पाण्याच्या शोधात वन्यप्राणी शेतातील उरलेसुरले हिरवे पीक खात असल्याने आर्थिक फटका बसत आहे. या परिसरात रानडुक्कर, तरस, हरिण, लांडगे, बिबटे यांसह मोर आणि इतर लहान-मोठ्या पक्ष्यांचा वावर आहे. हे प्राणी टोळक्याने अन्न व पाण्याच्या शोधात गावाकडे वळत असल्याने नागरिकांमध्ये भीती वाढली आहे. वन विभागाने तातडीने पाणवठे तयार करून त्यामध्ये पाणी उपलब्ध करून द्यावे तसेच वन्यप्राण्यांसाठी अन्नधान्याची व्यवस्था करावी, अशी मागणी पशुपक्षीप्रेमी आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सारांश वृत्त

### मिझोराम: बारावीचा निकाल जाहीर

**आयझॉल:** मिझोराममध्ये बुधवारी झालेल्या इयत्ता १२वीच्या बोर्ड परीक्षेत ८७.६७ टक्के उत्तीर्णतेची नोंद झाली असून, मुलांनी मुलींपेक्षा किंचित जास्त गुण मिळवले आहेत. मिझोराम बोर्ड ऑफ स्कूल एज्युकेशनने प्रकाशित केलेल्या निकालांनुसार, कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांमध्ये मुलांनी ८७.७ टक्के यश मिळवले, तर मुलींनी ८७.६६ टक्के यशासह त्यांचा पाठपुरावा केला.

### पाकच्या आर्थिक प्रगतीला धक्का

**इस्लामाबाद :** पंतप्रधान शहबाज शरीफ बुधवारी म्हणाले की, अमेरिका-इराण युद्धामुळे गेल्या दोन वर्षात पाकिस्तानने केलेल्या आर्थिक प्रगतीला गंभीर धक्का बसला आहे. तसेच, दोन्ही युद्धखोर गटांमधील तणाव कमी करण्यासाठी आणि पश्चिम आशियामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपले सरकार प्रयत्न सुरूच ठेवेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. फेब्रुवारीमध्ये युद्ध सुरू झाल्यापासून जागतिक बाजारात इंधनाच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत, असे नमूद करत ते म्हणाले, युद्धापूर्वी आमचे साप्ताहिक तेल बिल सुमारे ३०० दशलक्ष डॉलर्स होते आणि आज ते ८०० दशलक्ष डॉलर्सपर्यंत वाढले आहे. एक कार्यदल दररोज परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे, असे त्यांनी सांगितले आहे.

### बालीमध्ये एअर इंडियाच्या वैमानिकाचा मृत्यू

**नवी दिल्ली :** नियोजित विश्रांतीवर असलेल्या एअर इंडियाच्या एका वैमानिकाचा बुधवारी बाली येथे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. एअरलाइनच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, जवळपास ४० वर्षे वयाच्या फर्स्ट ऑफिसरने मंगळवारी दिल्ली ते बाली हे विमान चालवले. एका निवेदनात, एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, फर्स्ट ऑफिसर बालीमध्ये नियोजित कू विश्रांतीवर असताना त्यांना हॉटेलमध्ये तीव्र अस्वस्थ वाटू लागले.

## शबरीमला प्रकरणी सर्वोच्च विचारणा

# नास्तिक व्यक्ती प्रवेशाचा हक्क कसा सांगते?



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताचे सर्वोच्च न्यायालयाने शबरीमला मंदिर प्रवेश प्रकरणात महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत, "उत्तर भारतातील एखादी नास्तिक व्यक्ती शबरीमला मंदिरात प्रवेशाचा हक्क कसा सांगू शकते?" असा प्रश्न उपस्थित केला.

केरळमधील शबरीमला मंदिर येथे महिलांच्या प्रवेशाबाबत तसेच धार्मिक स्वातंत्र्याच्या कक्षेबाबत दाखल याचिकांवर नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी सुरू आहे. या वेळी न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रवेशाचा हक्क कोण मांडत आहे, भक्त की अभक्त हे तपासणे महत्त्वाचे ठरेल.

घटनापीठात सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यासह न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना, एम. एम. सुंदरेश, अहसानुद्दीन अमानुल्ला, अरविंद कुमार, ऑगस्टीन जॉर्ज मसिह, प्रसन्ना बी. वराळे, आर. महादेवन आणि जॉयमाल्या बागची यांचा समावेश आहे.

याचिकाकर्त्यांच्या बाजूने ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी युक्तिवाद करत सांगितले की, अनुसूचित जातीतील महिलेला मंदिरात प्रवेश नाकारला जाणे हे संविधानाच्या कलम १७ (अस्पृश्यता निर्मूलन) चे उल्लंघन ठरू शकते. तसेच, मंदिरात प्रवेश व पूजा करण्याचा अधिकार हा कलम २५(१) अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे त्यांनी नमूद केले. सप्टेंबर २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने ४:१ बहुमताने १० ते ५० वयोगटातील महिलांना शबरीमला मंदिरात प्रवेशबंदी उठवली होती. या निर्णयानंतर बिंदू अमिनी आणि कनकदुर्गा या दोन महिलांनी मंदिरात प्रवेश केला होता. मात्र, न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना स्पष्ट केले की संबंधित महिलेला अनुसूचित जातीची असल्यामुळे रोखण्यात आले नव्हते, तर ती १० ते ५० वयोगटातील असल्यामुळे अडवण्यात आले होते.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. "या हक्कावर दावा करणारी व्यक्ती भक्त आहे का? की एखादी नास्तिक व्यक्ती, जी या मंदिराशी संबंधित नाही?" त्यांनी पुढे नमूद केले की, "एखादी व्यक्ती उत्तर भारतात असून दक्षिण भारतातील मंदिरात प्रवेशाचा हक्क सांगत असेल, तर त्या मुद्द्यावरही विचार करावा लागेल." जयसिंग यांनी युक्तिवाद करत महिलांना त्यांच्या "सर्वात उत्पादक आणि सर्जनशील वयोगटात" (१० ते ५० वर्षे) मंदिर प्रवेश नाकारला जात असल्याचे सांगितले आणि ही मोठी वंचितता असल्याचे अधोरेखित केले.

न्यायालयाने धर्मातील विविधतेचा आदर करण्यावर भर देत, संविधानाच्या कलम २६(ब) अंतर्गत धार्मिक पंथांना त्यांच्या परंपरा जपण्याचे संरक्षण दिले असल्याचेही नमूद केले. या प्रकरणात धार्मिक स्वातंत्र्य, लैंगिक समानता आणि परंपरांचा समतोल कसा साधायचा, यावर अंतिम निर्णय महत्त्वाचा ठरणार असून सुनावणी अद्याप सुरू आहे.

# केंद्रीय दलांकडून बंगालमध्ये दहशत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बुधवारी निवडणूक प्रक्रियेदरम्यान केंद्रीय सुरक्षा दल आणि निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या निरीक्षकांवर गंभीर आरोप करत जोरदार टीका केली. त्यांनी केंद्रीय दलांकडून "दहशत निर्माण" केली जात असल्याचा आरोप करत ते भारतीय जनता पक्षाच्या सूचनेनुसार काम करत असल्याचा दावा केला.

भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून तृणमूल काँग्रेस (टीएमसी)च्या उमेदवार म्हणून रिंगणात असलेल्या बॅनर्जी यांनी मतदानाच्या दिवशी सकाळीच विविध मतदान केंद्रांना भेट दिली. यावेळी त्यांनी बाहेरील लोक मतदान प्रक्रियेत हस्तक्षेप करत असल्याचा आरोप केला. "नवीन आणलेले लोक त्यांना हवे तसे वागत आहेत. मतदान मतदारांनी करायचे असते, सुरक्षा दलांनी नाही," असे त्या म्हणाल्या.

बॅनर्जी यांनी टीएमसीचे झेंडे आणि पोस्टर्स हटवण्यात आल्याचाही आरोप केला. "न्यायालयाचा आदेश असूनही सीआरपीएफ त्याचे पालन करत नाही. आम्ही अवमानाची नोटीस दिली आहे. तरीही निरीक्षक आणि दल भाजपच्या म्हणण्यानुसार वागत आहेत," असा आरोप त्यांनी केला.

भवानीपूर हा बॅनर्जी यांचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो. येथे त्यांची लढत विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांच्याशी होत असून, ही लढत २०२१ मधील नंदीग्राम पराभवाचा राजकीय 'बदला' म्हणून पाहिली जात आहे. बॅनर्जी यांनी टीएमसी कार्यकर्त्यांवर हल्ले होत असल्याचाही दावा केला. लोकशाहीचा उत्सव असलेल्या निवडणुका शांततेत व्हायला हव्यात; मात्र येथे गुंडगिरी सुरू आहे, असे त्यांनी म्हटले. निवडणूक आयोगाने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी मागणी केली. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यात राज्यातील १४२ मतदारसंघांमध्ये मतदान होत असून, हा टप्पा निवडणुकीचा कल ठरवणारा निर्णायक टप्पा म्हणून पाहिले जात आहे.

# भारत-चीनचा एलएसीवरील शांततेवर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बिश्केक :** भारताचे संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांनी मंगळवारी येथे चीनचे संरक्षण मंत्री डोंग जू यांची भेट घेत द्विपक्षीय व प्रादेशिक सुरक्षाविषयक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) शांतता व सुव्यवस्था राखण्यावर दोन्ही बाजूंनी विशेष भर देण्यात आला.

एससीओच्या संरक्षण मंत्र्यांच्या परिषदेदरम्यान ही बैठक झाली. यावेळी पश्चिम आशियातील ताज्या घडामोडींसह जागतिक सुरक्षेच्या प्रश्नांवरही विचारविनिमय करण्यात आला. "बिश्केकमध्ये चीनचे संरक्षण मंत्री डोंग जून यांच्याशी संवाद साधता आला, याचा आनंद झाला," असे राजनाथ सिंह यांनी सोशल मीडियावर नमूद केले.

संरक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार, दोन्ही देशांनी सीमावर्ती भागात स्थैर्य राखण्याच्या गरजेवर सहमती दर्शवली. दोन हजार वीसमधील गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर तणावपूर्ण झालेले संबंध सुधारण्यासाठी दोन्ही देश प्रयत्नशील आहेत. राजनैतिक व लष्करी पातळीवरील चर्चेनंतर पूर्व लडाखमधील अनेक संघर्षस्थळांवरून सैन्य माघारी घेण्यात यश आले आहे. ऑक्टोबर दोन हजार चोवीसमध्ये देपसांग व डेमचोक येथील उर्वरित तणावग्रस्त ठिकाणांबाबतही सैन्यमाघारीचा करार झाला होता. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जिनपिंग यांच्यात कझान येथे चर्चा होऊन संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला होता.

राजनाथसिंह यांनी रशियाचे संरक्षणमंत्री आँद्रेय बेलिसोव्ह यांचीही भेट घेतली. या चर्चेत एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीच्या पुरवठ्यासह संरक्षण सहकार्यावर चर्चा झाली. दोन हजार अठरामध्ये भारताने पाच एस-४०० युनिट्ससाठी सुमारे पाच अब्ज डॉलर्सचा करार केला होता, त्यापैकी तीन युनिट्स आधीच मिळाले आहेत. चौथे युनिट लवकरच मिळणार आहे.

# लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांना मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** लडाखसाठी पाच नवीन जिल्ह्यांना मंजुरी मिळाल्यानंतर केंद्रशासित प्रदेशातील जिल्ह्यांची एकूण संख्या सात झाली आहे. या निर्णयानंतर प्रशासकीय संतुलन, लोकसंख्या आणि भौगोलिक विभागणीवरून नव्याने वाद सुरू झाले आहेत.

अधिकृत राजपत्र अधिसूचनेनुसार, नव्याने निर्माण झालेल्या जिल्ह्यांमध्ये २७ महसुली गावांसह शाम, २४ गावांसह चांगथांग, ३० गावांसह नुब्रा, २६ गावांसह झांस्कर आणि १९ गावांसह द्रास यांचा समावेश आहे. या पुनर्रचनेनंतर मुस्लिमबहुल कारगिल जिल्हा ८० महसुली गावांसह सर्वात मोठा जिल्हा ठरला आहे. दुसरीकडे, बौद्धबहुल लेह जिल्ह्यात केवळ ४४ महसुली गावे असून ती तुलनेने लहान राहिला आहे. यामुळे प्रशासकीय समतोलाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार, लडाखची एकूण लोकसंख्या २,७४,२८९ असून त्यापैकी १,४०,८०२ लोक कारगिलमध्ये, तर १,३३,४८७ लोक लेहमध्ये राहतात. कारगिलमधील वकील मुस्तफा हाजी यांनी सामाजिक माध्यमावर प्रतिक्रिया देताना, "एका जिल्ह्यात तब्बल ८० महसुली गावे कशी?" असा सवाल उपस्थित केला. त्यांनी या निर्णयामुळे लोकसंख्येचा संतुलनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली.

लडाख ऑटोनॉमस हिल डेव्हलपमेंट कौन्सिल कारगिलचे मुख्य कार्यकारी सल्लागार डॉ. मोहम्मद जाफर अखून यांनी नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीचे स्वागत केले असले, तरी संकू आणि शकर-चिकटन-शारगोले उपविभागांचा समावेश न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. "ही वगळण्याची कृती अत्यंत दुर्दैवी आहे," असे ते म्हणाले.

अखून यांच्या मते, संकू हा कारगिलमधील सर्वात जुन्या व लोकसंख्या असलेल्या उपविभागांपैकी एक असून, त्याला जिल्ह्याचा दर्जा देणे आवश्यक आहे. त्यांनी केंद्र सरकारने याबाबत स्वतंत्र अधिसूचना काढावी, अशी मागणी केली.

दरम्यान, खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही या निर्णयावर टीका करत, "दोन जिल्ह्यांऐवजी सात जिल्हे करण्यात आले असले, तरी या निर्णयामागे धार्मिक व प्रशासकीय संतुलन बिघडवण्याचा प्रयत्न दिसतो," असा आरोप केला. त्यांनी सांगितले की, "३९.६५ टक्के बौद्ध लोकसंख्येसाठी पाच जिल्हे, तर ४६.४० टक्के मुस्लिम लोकसंख्येसाठी केवळ दोन जिल्हे आहेत," याकडे लक्ष वेधले.

# द्वेषपूर्ण भाषणावर नवे निर्देश देण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील द्वेषपूर्ण भाषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी अतिरिक्त निर्देश जारी करण्यास स्पष्ट नकार दिला. विद्यमान कायदे आणि तरतुदी पुरेशा असून समस्या कायद्याच्या अभावामुळे नव्हे, तर अंमलबजावणीतील त्रुटींमुळे निर्माण होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, नवीन फौजदारी गुन्हे निर्माण करणे हे पूर्णपणे विधिमंडळाच्या अखत्यारीत येते. घटनात्मक न्यायालये कायद्याचा अर्थ लावू शकतात; मात्र कायदा करण्यास भाग पाडू शकत नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

न्यायालयाने सांगितले की, द्वेषपूर्ण भाषण रोखण्यासाठी कायदेशीर क्षेत्र रिक्त नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत फौजदारी कार्यवाही सुरू करण्यासाठी व्यापक चौकट उपलब्ध असून कोणत्याही कायदेशीर पोकळी नाही. तसेच विद्यमान कायद्यानुसार दंडाधिकाऱ्यांना पर्यवेक्षकीय अधिकार दिलेले आहेत.

एफआयआर संदर्भात न्यायालयाने ललिता कुमारी केस निर्णयाचा उल्लेख करत सांगितले की, दखलपात्र गुन्ह्याची माहिती मिळाल्यास पोलिसांनी एफआयआर नोंदवणे बंधनकारक आहे. तसे न झाल्यास पीडित व्यक्ती वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किंवा दंडाधिकाऱ्यांकडे दाद मागू शकते.

न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५६(३) अंतर्गत तपासाचे आदेश देणे म्हणजे गुन्ह्याची दखल घेणे होत नाही. तसेच, कायदा करण्याचा अधिकार संसद व राज्य विधानमंडळांकडेच राहतो, यावर खंडपीठाने पुन्हा भर दिला.

## इराणला अमेरिकेच्या ट्रम्प यांचा इशारा

# अणुकरारावर ठोस भूमिका घ्या




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करत इराणला कडक इशारा दिला आहे. "इराणला स्वतःला सावरता येत नाही. अण्वस्त्रविरहित कराराचर स्वाक्षरी कशी करायची हे त्यांना माहीत नाही. त्यांनी लवकरच शहाणे व्हायला हवे," असे त्यांनी म्हटले आहे.

ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, अमेरिकेच्या अणुकार्यक्रमासंदर्भात लवकरच राजनैतिक तोडगा न निघाल्यास अमेरिका अधिक कठोर भूमिका घेईल. त्यांनी सोशल मीडियावर असॉल्ट रायफलसह स्वतःचा फोटो पोस्ट करत "आता पुरे झाला सभ्यपणा" असा इशाराही दिला. या पार्श्वभूमीवर, इराणने वॉशिंग्टनने मांडलेल्या अटींना विरोध कायम ठेवल्यास अमेरिका अधिक आक्रमक धोरण अवलंबू शकते, असे संकेत मिळत आहेत. ट्रम्प प्रशासन पूर्वीच्या करारांना अपुरे ठरवत नवा 'ट्रम्प करारासाठी' प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ट्रम्प यांनी तेहरानच्या अलीकडील राजनैतिक हालचालीवर नाराजी व्यक्त करत, अणुप्रश्नावर थेट तोडगा निघेपर्यंत चर्चा पुढे नेली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यांनी इराण "कोलमडण्याच्या अवस्थेत" असल्याचा दावा करत होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यासाठी दबाव टाकत असल्याचेही म्हटले.

इराणने अमेरिकेसोबत युद्धविराम आणि सामुद्रधुनीतील वाहतूक सुरळीत करण्याचा प्रस्ताव दिला असला, तरी त्यात अणुकार्यक्रम, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान आणि निर्बंधांवरील चर्चा पुढे ढकलण्याचा प्रयत्न असल्याने अमेरिकेचा त्याला नकार देत आहे.

दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवण्यासाठी इस्लामाबाद व सेंट पीटर्सबर्ग येथे दौरे केले असून, त्यांनी व्लादिमीर पुतिन यांचीही भेट घेतली आहे. याचदरम्यान, गल्फ कोऑपरेशन कौन्सिलच्या बैठकीत मोहम्मद बिन सलमान यांच्या नेतृत्वाखाली इराणच्या हालचालींवर टीका करण्यात आली. कतार, बहरीन, कुवेत आणि संयुक्त अरब अमिरातीसह सदस्य देशांनी सामुद्रधुनी बंद करण्याच्या कोणत्याही प्रयत्नांना विरोध दर्शवत "सुरक्षा आणि नौवहन स्वातंत्र्य" पुनर्स्थापित करण्याचे आवाहन केले.

माध्यमातील वृत्तांनुसार, ट्रम्प प्रशासन इराणविरोधात दीर्घकालीन आर्थिक दबाव वाढवण्यासाठी नाकेबंदीचा पर्यायही विचारात घेत आहे. या योजनेनुसार इराणच्या सागरी मार्गावर नियंत्रण ठेवून त्याची अर्थव्यवस्था आणि तेल निर्यात कमकुवत करण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

# पश्चिम बंगालमधील तैनातीवर अब्दुल्ला नाराज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरचे तीन वेळा माजी मुख्यमंत्री राहिलेले फारुख अब्दुल्ला यांनी बुधवारी पश्चिम बंगाल निवडणुकीदरम्यान केंद्रीय पोलीस दल आणि नोकरशहांची मोठी तुकडी तैनात केल्याबद्दल निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली.

'बंगाली लोकांवर विश्वास ठेवला जात नाही का?', असा प्रश्न सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष असलेल्या अब्दुल्ला यांनी विचारला आणि पश्चिम



बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात राष्ट्रीय नेत्यांनी वापरलेल्या वक्तव्यांचा निषेध केला. बॅनर्जी यांच्यावर टीका करताना वापरलेली भाषा 'असंसदीय आणि राष्ट्राला न शोभणारी' असल्याचे त्यांनी म्हटले.

एका बलवान भारतासाठी नागरिकांचा आदर आवश्यक असल्याचे सांगताना ते म्हणाले, "जर तुम्हाला एक बलवान भारत हवा असेल, तर बंगाली लोकांना कोणत्याही दबावाशिवाय आपले नेतृत्व निवडण्याचा अधिकार आहे."

अब्दुल्ला यांनी सरकारमधील काही गटांच्या राज्य निवडणुका आणि प्रादेशिक अस्मितेबाबतच्या दृष्टिकोनावर टीका करत, पश्चिम बंगालच्या लोकांना त्यांच्या स्वतःच्या देशात "परक्यांसारखी वागणूक दिली जात आहे का?" असा प्रश्न उपस्थित केला.

पश्चिम बंगालमधील निवडणुकीच्या काळात केंद्रीय पोलीस दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा संदर्भ देत त्यांनी यामागील हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणूक प्रक्रियेच्या संस्थात्मक देखरेखीबद्दल बोलताना अब्दुल्ला यांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. "निवडणूक आयोगाने ज्या प्रकारे परिस्थिती हाताळली आहे, त्याबद्दल मला खेद वाटतो," असे ते म्हणाले.

## एप्रिलमध्ये निर्यातीत चांगली वाढ: गोयल

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील संकटामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना न जुमानता, एप्रिल महिन्याच्या पहिल्या तीन आठवड्यांत निर्यातीत आतापर्यंत चांगली वाढ झाली आहे, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी बुधवारी सांगितले. भारताने अंतिम केलेले मुक्त व्यापार करार देशांतर्गत उद्योगांना मोठी चालना देतील. गेल्या एप्रिलच्या याच कालावधीच्या तुलनेत एप्रिलच्या पहिल्या तीन आठवड्यांत निर्यातीत वाढ झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

# रशियाची परेड शस्त्रांस्त्राशिवाय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीच्या पराभवाच्या ८१ व्या वर्धानिमित्त यावर्षी होणारी रशियाची पारंपरिक परेड रणगाडे, क्षेपणास्त्रे आणि इतर लष्करी उपकरणांशिवाय पार पडेल, असे रशियन संरक्षण मंत्रालयाने मंगळवारी रात्री उशिरा एका निवेदनात म्हटले आहे.

जवळपास दोन दशकांत आणि युक्रेनमधील रशियाच्या चार वर्षांहून अधिक काळाच्या युद्धकाळात, ९ मे रोजी, ज्या दिवशी रशिया आपला सर्वात महत्त्वाचा धर्मनिरपेक्ष सण साजरा करतो, त्या दिवशी मॉस्कोच्या रेड स्क्वेअरमधून कोणतीही लष्करी उपकरणे जाणार नाहीत, अशी ही पहिलीच वेळ असेल. क्रेमलिनने आपली लष्करी ताकद आणि जागतिक प्रभाव दाखवण्यासाठी या दिवसाचा वापर केला आहे. २००८ पासून दरवर्षी रेड स्क्वेअरवरील विजय दिनाच्या संचलनामध्ये लष्करी उपकरणे आणि विविध शस्त्रास्त्रांचा समावेश असतो. या आठवड्यात मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात, लष्करी सामग्रीचा ताफा तसेच कॅडेट्सना संचलनातून वगळण्यामागे "सध्याची परिचालन परिस्थिती" हे कारण दिले आहे. निवेदनात यावर अधिक तपशील देण्यात आलेला नाही.

क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी बुधवारी पत्रकारांसोबतच्या कॉन्फरन्स कॉलमध्ये युक्रेन आणि त्यांच्या "दहशतवादी कारवायांना" जबाबदार धरले. "धोका कमी करण्यासाठी सर्व उपाययोजना केल्या जात आहेत," असे ते म्हणाले.

## मेरठला प्रयागराजशी जोडणारा ५९४ किलोमीटर लांबीचा मार्ग

# पीएम मोदींच्या हस्ते गंगा एक्सप्रेसवेचे उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी हरदोई येथे आयोजित एका समारंभात मेरठला प्रयागराजशी जोडणाऱ्या ५९४ किलोमीटर लांबीच्या गंगा एक्सप्रेसवे या प्रमुख पायाभूत प्रकल्पाचे उद्घाटन केले.

पंतप्रधानांनी आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि इतर वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत एका बटणाच्या स्पर्शाने प्रवेश-नियंत्रित द्रुतगती मार्गाचे अनावरण केले.

मेरठ, हापूर, बुलंदशहर, अमरोहा, संभल, बदायूं, शाहजहानपूर, हरदोई, उन्नाव, रायबरेली, प्रतापगड आणि



प्रयागराज या १२ जिल्ह्यांमधून जाणारा हा सहापदरी द्रुतगती मार्ग ताशी १२० किमीपर्यंतच्या वेगासाठी तयार करण्यात आला आहे. याचा विस्तार आठ पदरी करता येतो. यामुळे पश्चिम आणि पूर्व उत्तर प्रदेशदरम्यानच्या प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल, तसेच माल आणि प्रवाशांची वाहतूक सुधारेल, अशी अपेक्षा आहे.

सार्वजनिक-खासगी भागीदारी मॉडेल अंतर्गत विकसित केलेला हा प्रकल्प इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम, सीसीटीव्ही निगराणी, आपत्कालीन कॉल बॉक्स, रुग्णवाहिका आणि गस्ती पथके यांसारख्या आधुनिक सुरक्षा आणि वाहतूक प्रणालींनी सुसज्ज आहे. भारतीय हवाई दलाच्या आपत्कालीन लँडिंगसाठी शाहजहानपूरजवळ ३.२ किमी लांबीची हवाईपट्टी हे याचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, या द्रुतगती मार्गामुळे औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स, कृषी विपणन आणि प्रादेशिक विकासाला चालना मिळेल. रोजगारनिर्मितीसाठी आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी या कॉरिडॉरच्या बाजूने गोदामे, शीतगृहे आणि अन्न प्रक्रिया केंद्रांसह एकात्मिक उत्पादन व लॉजिस्टिक्स क्लस्टर्स विकसित केले जात आहेत.

हा कॉरिडॉर पूर्वांचल, आग्रा-लखनौ, बुंदेलखंड आणि गोरखपूर लिंक द्रुतगती मार्गासारख्या इतर प्रमुख द्रुतगती मार्गांशी जोडला जाईल, ज्यामुळे राज्यभर एक व्यापक, परस्पर-जोडलेले रस्ते जाळे निर्माण होईल. या प्रकल्पात शेतकऱ्यांच्या भूमिकेचे कौतुक करताना योगी आदित्यनाथ म्हणाले की, १२ जिल्ह्यांमधील एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी द्रुतगती मार्गासाठी जमीन दिली आहे. "मी सर्व 'अन्नदाता' शेतकऱ्यांचे आभार मानतो, ज्यांच्या पाठिंब्यामुळे हा प्रकल्प साकार झाला," असे ते म्हणाले.

त्यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी सुमारे १८,००० एकर जमीन संपादित करण्यात आली असून, जवळपास ७,००० एकर जमीन औद्योगिक समूह आणि लॉजिस्टिक्स हबसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी या द्रुतगती मार्गाचे वर्णन गावे, शेतकरी, उद्योजक आणि तरुणांना जोडणारी "जीवनरेखा" असे केले. या प्रकल्पाची पायाभरणी डिसेंबर २०२१ मध्ये पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाली होती आणि तो निर्धारित वेळेत पूर्ण होणे हे पायाभूत सुविधांच्या विस्तारावर सरकारचे लक्ष दर्शवते, असे आदित्यनाथ यांनी नमूद केले.